# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २९/०१/२०२२ (शनिवार)**

**(सायंकाळ)**

---

### अपघातात मृत्यू

**पो.स्टे. कोंढाळी** :— अंतर्गत २५ कि.मी. अंतरावरील मौजा अडेगाव रोड देवडी ते डिगडोह पांडे गावचे मध्ये येथे दिनांक २८/०१/२०२२ चे ०१.३० वा. दरम्यान फिर्यादीचा नातु नामे— चंद्रकांत दुर्वेशवर मडामे वय १९ वर्ष हा त्याचे जवळील एमएच— ४०/बीएन— ०६७१ क्रमांकाच्या मोटरसायकलने शिवा सावंगा येथुन पेपर देवुन अडेगाव रोडने घरी परत जात होता. त्यादरम्यान बाजारगाव कडुन अडेगाव कडे येणारे अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मोटरसायकल चालकास समोरून धडक दिली. या अपघातात चंद्रकांत मडामे हा गंभीर जखमी होवून त्याचा मृत्यु झाला. आरोपी हा घटणास्थळावरून आपले वाहन घेवुन पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— मारोतराव कोंडबाजी मडामे वय ६० वर्ष, रा. अडेगाव त हिंगणा जि नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादंवी. सहकलम १८४, १३४/१७७ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक रंजित जाधव मो नं ७७४१८८१४७६ हे करीत आहे.

### अवैधरीत्या शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत ७ कि.मी. अंतरावरील कुचक मोहल्ला पिपळा डागबंगला येथे दिनांक २९/०१/२०२२ चे १०/३० वा. ते ११/१५ वा. दरम्यान आरोपी नामे— आकाश हरीचंद्र तांडेकर, वय २३ वर्ष, रा. वार्ड नं ०४ खापरखेडा हा कुचक मोहल्ला पिपळा डागबंगला जवळ कोणत्यातरी हस्तक्षेपणीय गुन्हा करण्याचे उददेशाने फिरतांना मिळुन आला. त्यास ताब्यात घेवुन पोलिसांनी त्याची अंगझडती घेतली असता त्याचे अंगझडतीत कमरेला एक लोखंडी अग्नीशस्त्र(देशी बनावटी कट्टा) किमती १०,०००/— रू. तसेच एक पितळी जिवंत कारतुस किमत ५००/—रू. असा एकुण १०,५००/— रू. चा माल आरोपीचे ताब्यातुन जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे उमेश ठाकरे पो स्टे खापरखेडा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३, २५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि मिश्रा पो स्टे खापरखेडा मो नं ९५११२९०८४९ हे करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर